# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | आलोसे क्र.१) श्री.किरण केसापुरे, व्यवसाय—नोकरी, पद—शाखा अभियंता, वर्ग २ ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा जि. बुलढाणा<br>आरोपी क्र.२) श्री.गजानन आबाराव इप्पर, वय २६ वर्ष, पद— कंत्राटी क्षेत्र पर्यवेक्षक, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, सिंदखेडराजा<br>आरोपी क्र.३) खाजगी इसम श्री.राजेश तुकाराम जायभाये, वय ५० वर्ष, व्यवसाय—शेती रा पांगरखेड ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा |
| लाच मागणी | २२०००/— रुपये तडजोडीअंती १४०००/—रुपये |
| लाच स्विकारले | १४०००/— रुपये |
| घटनास्थळ | जालना ते मेहकर रोड, सावखेड तेजन फाटा ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा |
| घटना तारीख | दिनांक ०५.०३.२०२४ |

थोडक्यात हकीकत :— यातील तक्रारदार यांनी दिनांक ०१.०३.२०२४ रोजी लाप्रवि बुलढाणा घटकाकडे तक्रार दिली की, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत झालेल्या सांडपाणी व घनकचऱ्याचे कामाची देखरेख तसेच बिलांचे इतर प्रक्रियेबाबत कामे पाहत असुन ग्रामपंचायत स्तरावर सांडपाणी सांडपाणी व घनकचऱ्याचे केलेल्या कामाचे ३,८८,२५४/— रु.चे बिल काढण्यासाठी उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा यांच्या कार्यपुर्णत्वाचा दाखल आवश्यक असुन सदर कार्यपुणत्वाचा दाखल देण्यासाठी कंत्राटी कर्मचारी श्री.गजानन इप्पर यांनी स्वत: करिता २०००/— रुपये व उपअभियंता श्री. चव्हाण साहेब तसेच शाखा अभियंता श्री. केसापुरे साहेब यांचेकरिता २०,०००/— रुपये लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०१.०३.२०२४ रोजी आयोजीत पडताळणी कारवाई दरम्यान श्री.गजानन इप्पर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना स्वत:करीता २०००/— रुपये व उपविभागीय अभियंता श्री. चव्हाण तसेच शाखा अभियंता श्री. केसापुरे यांचेकरिता तडजोडीअंती १५,०००/— रुपये असे एकुण १७,०००/— रुपये लाचेची मागणी केली. तसेच खाजगी इसम श्री. राजेश जायभाये यांनी तक्रारदार यांना कंत्राटी कर्मचारी गजानन इप्पर यांना लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे स्पष्ट झाले. तसेच दिनांक ०४.०३.२०२४ रोजी लोकसेवक श्री.केसापुरे, शाखा अभियंता यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी केली असता लोकसेवक श्री. केसापुरे यांनी तडजोडअंती १२,०००/— रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम कंत्राटी कर्मचारी श्री. गजानन इप्पर यांचेकडे देण्याचे सांगितले. त्यावरुन दिनांक ०५.०३.२०२४ रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान कंत्राटी कर्मचारी श्री.गजानन इप्पर यांनी तक्रारदार यांचेकडून पंच क्र.१ यांचेसमक्ष १४,०००/— रुपये स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आलोसे क्र.१) श्री.किरण केसापुरे, व्यवसाय—नोकरी, पद—शाखा अभियंता, वर्ग २, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा जि. बुलढाणा आलोसे क्र.२) श्री. गजानन आबाराव इप्पर, पद— कंत्राटी क्षेत्र पर्यवेक्षक, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, सिंदखेडराजा व आरोपी क्र.३) खाजगी इसम श्री. राजेश तुकाराम जायभाये, रा पांगरखेड ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा यांचे विरुध्द पोलीस स्टेशन सिंदेखेडराजा येथे कलम ७, ७A, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

**मार्गदर्शन :—** १. मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
२. मा. श्री. अनिल पवार, अप्पर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

**कार्यवाही पथक :—** श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. बुलढाणा

श्री.महेश भोसले, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा, एएसआय शाम भांगे, पोहेकॉ. प्रविण बैरागी, पोना विनोद लोखंडे, पोकॉ रंजित व्यवहारे, गौरव खत्री, चानापोकॉ. नितीन शेटे यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलढाणा कार्यालय दुरध्वनी कमांक ०७२६२—२४२५४८ व टोल फि कमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केले आहे.

पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा — सत्यमेव जयते

( श्रीमती शितल घोगरे )
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा

Scanned with CamScanner